**विषय :** महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती, अधिनियम १९६१ चे कलम ९५ (२) अ (तीन) मधील तरतूदीनुसार ***"मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अधिकाराचे प्रत्यायोजन".***

## नाशिक जिल्हा परिषद, नाशिक

**" सामान्य प्रशासन विभाग "**

जावक क्रमांक : साप्रवि/आस्था-६/३६८/२०१७.

नाशिक, दिनांक : १४/०८/२०१७.

**वाचा :** ०१. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम १९६१ चे कलम ९५ (२) अ (तीन)

**-: आ दे श :-**

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम १९६१ चे कलम ९५ (२) अ (तीन) मधील तरतूदीनुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना जिल्हा परिषदेच्या प्रथम श्रेणी व द्वितीय श्रेणी अधिकाऱ्यांच्या दोन महिन्यापर्यंत रजा मंजुर करण्याचे अधिकार आहेत.

प्रदान करणेत आलेल्या, मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारांपैकी जिल्हा परिषदेच्या प्रथम श्रेणी अधिकाऱ्यांच्या दोन महिन्यापर्यंतच्या रजा मंजुर करण्याचे अधिकार कायम ठेवण्यात येत असुन खालील अधिकाराचे प्रत्यायोजन करण्यात येत आहे.

जिल्हा परिषदेच्या अधिनस्त विविध विभागातील द्वितीय श्रेणी (वर्ग -२) चे अधिकारी यांच्या महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम १९६१ चे कलम ९५ (२) अ (तीन) चे तरतुदी अंतर्गत दोन महिन्यापर्यंत **रजा मंजुरीचे अधिकार अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक यांना या आदेशान्वये प्रदान करण्यात येत आहे. तसेच** जिल्हा परिषदेच्या अधिनस्त सामान्य प्रशासन विभागाच्या आस्थापनेवरील महारष्ट्र विकास सेवा द्वितीय श्रेणी (वर्ग -२) चे अधिकारी यांचे संभाव्य फिरती कार्यक्रम व मासिक दैनंदिनी मंजुर करण्याचे अधिकार अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांना प्रदान करण्यात येत आहे.

**सदरच्या अधिकाराचा वापर करतांना खालीलप्रमाणे कार्यपध्दतीचे अनुपालन करण्यात यावे.**

१. जिल्हा परिषदेच्या द्वितीय श्रेणी (वर्ग-२) अधिकाऱ्यांचे दोन महिन्यापर्यंतचे रजा प्रस्ताव संबंधित खाते प्रमुख यांनी सामान्य प्रशासन विभागामार्फत सादर करणे बंधनकारक आहे.

२. वरील अधिकाराचे प्रत्यायोजन हे फक्त द्वितीय श्रेणी (वर्ग-२) चे अधिकाऱ्यांच्या बाबतीत लागु राहील.

३. वरील अधिकाराचे प्रत्यायोजन हे संबंधितांचे रजा खाती शिल्लक असलेल्या रजेच्या मर्यादेत प्रदान करण्यात आलेले आहे. रजा शिल्लक नसलेल्या प्रकरणी हे प्रत्यायोजन लागु राहणार नाही.

४. संबंधित विभागाने रजा प्रस्ताव सादर करतांना रजेचे विहित नमुन्यातील आवेदन (परावर्तीत रजा वैद्यकिय कारणासाठी असल्यास वैद्यकिय अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र तसेच फिटनेस प्रमाणपत्र असणे आवश्यक राहील.) तसेच रजेवरून हजर झाले नंतरचे फिटनेस प्रमाणपत्र व रूजु रिपोर्टसह सादर करणे आवश्यक राहील.

५. महाराष्ट्र विकास सेवा वर्ग-२ अधिकारी यांनी त्यांचे संभाव्य फिरती कार्यक्रम विविध कालमर्यादेत सादर करणे बंधनकारक राहील.

वरील प्रमाणे प्रदान करणेत आलेल्या अधिकारांमध्ये कोणत्याही वेळी, कोणत्याही कारणास्तव बदल करणेची किंवा काढुन घेण्याचे अधिकार राखुन ठेवण्यांत येत आहे. प्रस्तुत आदेश **"स्थायी आदेश"** संचिकेत सामील करावा.

प्रस्तुत आदेशाची अंमलबजावणी, आदेशाच्या दिनांकापासुन करण्यांत यावी.

15/08

(दीपक कुमार मीना)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, नाशिक**

**प्रत : माहितीस्तव सविनय सादर.**
१. मा.अध्यक्षा, जिल्हा परिषद, नाशिक.
२.मा.उपाध्यक्षा, जिल्हा परिषद, नाशिक.
३.मा.सभापती, विषय समिती -----------------, जिल्हा परिषद, नाशिक.
**प्रत : माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी रवाना.**
१.अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्ह परिषद, नाशिक.
२.खाते प्रमुख (सर्व), ........................, जिल्हा परिषद, नाशिक.
३.गट विकास अधिकारी/ सहाय्यक गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व) .........................
४.गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती (सर्व) .........................
५. उप अभियंता (ल.पा./इवद/ग्रापापु), जि.प.उपविभाग (सर्व) .........................
६. .बाल विकास प्रकल्प अधिकारी, ए.बा.वि.यो.(सर्व) .........................
७.वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र (सर्व) .........................
**८प्रत : कार्यालयीन प्रत / ज्ञापन नस्ती.**